॥ तुकाराममहाराजकृत हरिपाठाचे अभंग ॥

१

नमिला गणपति माऊली सारजा । आतां गुरुराजा दंडवत ॥ १॥
गुरुरायाचरणीं मस्तक ठेविला । आल्या स्तुतीला द्यावी मती ॥ २॥
गुरुराया तुजऐसा नाहीं सखा । कृपा करुनी रंका धरीं हातीं ॥ ३॥
तुका म्हणे माता पिता गुरु बंधु । तूंचि कृपासिंधु पांडुरंगा ॥ ४॥

२

पहाटेच्या प्रहरीं म्हणा हरि हरी । तया सुखा सरी नाहीं दुजें ॥ १॥
केशव वामन नारायण विष्णु । कृष्ण संकर्षणु राम राम ॥ २॥
माधवा वामना श्रीधरा गोविंदा । अच्युत मुकुंदा पुरुषोत्तमा ॥ ३॥
नरहरी भार्गवा गोपाळा वासुदेवा । हृषीकेशा पावा स्मरणमात्रें ॥ ४॥
तुका म्हणे एका नामीं भाव । राहे होय साह्य पांडुरंग ॥ ५॥

३

अयोध्या मथुरा काशी अवंतिका । कांची हे द्वारका माया सत्य ॥ १॥
मोक्ष पुऱ्या ऐशा नित्य वाचे स्मरे । प्राणी तो उद्धरे स्मरणमात्रें ॥ २॥
नित्य नित्य मनीं हरि आठवावा । तेणेंचि तरावा भवसिंधु ॥ ३॥
तुका म्हणे ऐसा नामाचा महिमा । राहील जो नेमा तोचि धन्य ॥ ४॥

४

यमुना कावेरी गंगा भगीरथी । कृष्णा सरस्वती तुंगभद्रा ॥ १॥
नर्मदा आठवी वेळोवेळी वाचे । नाहीं भय साचें प्राणियासी ॥ २॥
जयाचे संगती प्राणी उद्धरती । दर्शनेंच होती मुक्ति प्राप्त ॥ ३॥
तुका म्हणे नामीं एकनिष्ठ भाव । तेथें वासुदेव सर्व काळ ॥ ४॥

५

प्रातःकाळीं नाम पवित्रचि घ्यावें । तेणें विसरावें जन्ममृत्यु ॥ १॥
नळ युधिष्ठिर जनक जनार्दन । स्मरणेंचि धन्य होती प्राणी ॥ २॥
न करा आळस नाम घेतां वाचे । नाहीं भय साचें प्राणियांसी ॥ ३॥
तुका म्हणे वाचें गाईल गोविंद । होईल परमानन्द नामें एका ॥ ४॥

६

कश्यप गौतम भारद्वाज अत्री । ऋषि विश्वामित्र नाम थोर ॥ १॥
जमदग्नि मुनि वसिष्ठ वर्णिला । तिन्हीं लोकीं झाला वंद्य एक ॥ २॥
नाम घेतां नुरे पाप ताप दैन्य । होय थोर पुण्य उच्चारितां ॥ ३॥
तुका म्हणे ऐसी उच्चारितां वाणी । तेथें अंतःकरणीं सुख होय ॥ ४॥

७

अहिल्या द्रौपदी सीता तारा चारी । मुख्य मंदोदरी पतिव्रता ॥ १ ॥
नामें घेतां त्यांची वाणी हे पवित्र । होय कुळगोत्र उद्धरण ॥ २ ॥
संकल्प विकल्प सांडोनियां दुरी । वाचे हरि हरी उच्चारावें ॥ ३ ॥
नाहीं बद्धकता तया संसाराची । जाचणी यमाची मग कैंची ॥ ४ ॥

८

व्यास अंबरीष वसिष्ठ नारद । शौनक प्रल्हाद भागवत ॥ १ ॥
नित्य स्मरण करी यांचें जरी प्राणी । पुन्हां नाहीं खाणी चौंऱ्याशींची ॥ २ ॥
शुक पराशर मुनि पुंडलीक । अर्जुन वाल्मीक नाम गाती ॥ ३ ॥
बली बिभीषण भीष्म रुक्मांगद । बकदाल्भ्य शुद्ध महाऋषि ॥ ४ ॥
तुका म्हणे यांचीं नामें येतां वाणीं । प्रत्यक्ष तो प्राणी देवाऐसा ॥ ५ ॥

९

गीता भागवत वेद उच्चारितां । पापाची तों वार्ता कोठें राहे ॥ १ ॥
सकळ वासना नामीं जे रंगली । साधनें राहिली मग कैंची ॥ २ ॥
म्हणोनिया नेम ऐसा तारी जीवा । होय तोचि देवा आवडता ॥ ३ ॥
उगवला दिवस जाय तो क्षणांत । विचारूनि हित वेगीं करा ॥ ४ ॥
तुका म्हणे स्मरा वेगीं विठोबासी । न धरा मानसीं दुजें कांहीं ॥ ५ ॥

१०

तीर्थांचें जें मूळ व्रतांचें जें फळ । ब्रह्म तें केवळ पंढरीये ॥ १ ॥
तें आम्हीं देखिलें आपुले नयनीं । फिटलीं पारणीं लोचनांचीं ॥ २ ॥
जिवींचा जिव्हाळा सुखाचा शेजार । उभें कटीं कर ठेवूनियां ॥ ३ ॥
जगाचा जनिता कृपेचा सागर । दीनां लोभपर दुष्टां काळ ॥ ४ ॥
सुरवरां चिंतनीं मुनिवरां ध्यानीं । आकार निर्गुणीं तोचि असे ॥ ५ ॥
तुका म्हणे नाहीं श्रुती आतुडलें । आम्हां सांपडलें गीतीं गातां ॥ ६ ॥

११

राजस सुकुमार मदनाचा पुतळा । रविशशिकळा लोपलिया ॥ १ ॥
कस्तुरी मळकट चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ २ ॥
मुकुट कुंडलें श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतिलें सकळही ॥ ३ ॥
कांसे सोनसळा पांघरे पाटोळा । घननीळ सावळा बाइयांनो ॥ ४ ॥
सकळही तुम्ही व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाहीं ॥ ५ ॥

१२

आवडे हें रूप गोजिरें सगुण । पाहतां लोचन सुखावले ॥ १ ॥
आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहे । जों मी तुज पाहें पांडुरंगा ॥ २ ॥
लांचावलें मन लागलीसे गोडी । ते जीवें न सोडी ऐसें झालें ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हीं मागावें लडिवाळी । पुरवावी आळी मायबापें ॥ ४ ॥

१३

शंख चक्र गदा रुळे वैजयंती । कुंडलें तळपती दोन्हीं कानीं ॥ १ ॥

मस्तकीं मुकुट नवरत्नहार । वरी पीतांबर पांघुरला ॥ २॥
रत्नहिरेजडित कटीं कडदोरा । रम्य शोभे हिरा बेंबीपाशी ॥ ३॥
जडित कंकण कर्णी शोभे मुद्रिका । लाचावला तुका भेटीसाठीं ॥ ४॥

१४

नेणें जप तप योग युक्ति ध्यान । करितां चिंतन रात्रंदिवस ॥ १॥
नेणें कांहीं देवा झालों उतराई । मागें लागों पाहीं बाळ जैसा ॥ २॥
भाव-गंगोदकें आम्ही शुद्ध पाहें । प्रक्षाळिले पाय विटेसहित ॥ ३॥
जन्मली जान्हवी ज्या ठायीं उत्तम । हारावया श्रम भाविकांचे ॥ ४॥
तुका म्हणे आम्ही झालों पुण्यवंत । सेविलें अमृत रामतीर्थ ॥ ५॥

१५

परिमळमिश्रित करूनि उटणें । नारायण तेणें तोषविला ॥ १॥
पय घृत दहि मधु ते शर्करा । गोशृंगधारा अखंडित ॥ २॥
करोनि संयुक्त ओपियली ईशा । पंचामृतें तैशी पंचविधि ॥ ३॥
तुका म्हणे जेथें गंगे जन्म झाला । प्रसाद दिधला आम्हालागी ॥ ४॥

१६

आपुलिया घरीं कष्ट तरी करीं । आणोनि घागरी गंगोदक ॥ १॥
करोनि विनंती विनवितो तुम्हां । स्नान पुरुषोत्तमा करा वेगीं ॥ २॥
उत्तम वस्त्रानें पुसावें तें अंग । करोनि अभ्यंग सर्वांगासी ॥ ३॥
परिधान वस्त्रें केलें पीतांबरें । तेणें हें साजिरें रूप दिसे ॥ ४॥
तुका म्हणे नेत्र पाहतां निवाले । ध्यान संचारलें हृदयामाजीं ॥ ५॥

१७

मन हा मोगरा अर्पूनी ईश्वरा । पुनरपि संसारा येणें नाहीं ॥ १॥
मन हें सेवंती अर्पूनी भगवंतीं । पुनरपि संसृती येणें नाहीं ॥ २॥
मन हें तुळसी अर्पूनी हृषीकशी । पुनरपि जन्मासी येणे नाहीं ॥ ३॥
तुका म्हणे ऐसा जन्म दिला देवा । तया वास व्हावा वैकुंठासी ॥ ४॥

१८

नामपुष्प शुद्ध गळां घाला हार । विवेक सारासार तुरा लावूं ॥ १॥
बोध भाळीं बुका क्षमा तुलसीदळ । वाहतां गोपाळ संतोषतो ॥ २॥
गाइलीया गुण संतोषें तयानें । करितां कीर्तनें आल्हादे तो ॥ ३॥
आल्हादे हा देव कीर्ति वाखाणितां । पवाडे सांगतां याचे यास ॥ ४॥
याचे यास करूं सर्व निवेदन । वारील हा शीण संसारींचा ॥ ५॥
संसाराचा वारा लागों नेदी अंगा । भावे पांडुरंगा आळवितो ॥ ५॥
तुका म्हणे आतां उजळली आरती । भावें तो श्रीपती ओंवाळूंया ॥ ७॥

१९

शब्दाचिया भावें केला उपचार । तेणें सर्वेश्वर संतोषला ॥ १॥
शब्दाचिया करें करविलें भोजन । धाला नारायण तेणें सुखें ॥ २॥

शब्दाचिया करें करविले आचमन । तांबूल अर्पून फळें पुष्पें ॥ ३॥
तुका म्हणे अन्नाआधी धूपदीप । उपचार अल्प समर्पिले ॥ ४॥

२०

मजलागीं नाहीं ज्ञानाची ती चाड । वाचे घेत गोड नाम तुझें ॥ १॥
नेणतें लेकरुं आवडीचें नातें । बोले वचनातें आवडीनें ॥ २॥
भक्तिविण कांहीं वैराग्य तें नाहीं । घातला विठाई भार तुज ॥ ३॥
तुका म्हणे नाचूं निर्लज्ज होउनी । नाहीं मझे मनीं दुजा भाव ॥ ४॥

२१

पूजूं नारायण शब्दाचे सुमनें । मंत्रपुष्प तेणें वाहियेलें ॥ १॥
भावाचे पैं हातीं जोडुनी ओंजळ । समर्पिलें जळ शुद्ध भावें ॥ २॥
मुखशुद्धी तांबूल दिलें तुळसीदल । आनंद सकळ ओसंडला ॥ ३॥
तुका म्हणे आतां उरलें नाहीं । नामाविण कांहीं बोलावया ॥ ४॥

२२

समाधान चित्ताचें चरणा आलिंगन । पायावरी मन स्थिरावलें ॥ १॥
जैसें केलें तैसें घालूं लोटांगणा । करूं प्रदक्षिणा नमस्कार ॥ २॥
प्रार्थितों मी तुज राहें माझें पोटीं । हृदयसंपुटीं देवराया ॥ ३॥
क्षेम आलिंगन दिली पयीं मिठी । घेतलीसे लुटी अमूप हो ॥ ४॥
तुका म्हणे आतां आनंदीआनंद । गाऊं परमानंद मनासंगें ॥ ५॥

२३

काय उपचार करूं पांडुरंगा । हेंचि मज सांगा विचारूनी ॥ १॥
कोणता पदार्थ उणा तुजपासी । बोलाया वाचेशीं मौन पडे ॥ २॥
शंकर-शेषादि करिती स्मरण । तेथें माझें मन गाऊं शके ॥ ३॥
इंद्र सुरवर वाहती सुमनें । तेथें म्यां वाहणें काय एक ॥ ४॥
परीं आवडीनें जोडूनी ओंजळ । बुका वाहूं माळ तुळसीची ॥ ५॥
उणें पुरें तुम्ही करूनियां सांगा । जिवालागीं मग सुख तेव्हां ॥ ६॥
तुका म्हणे माझी ऐकावी प्रार्थना । तुम्ही नारायणा सेवकाची ॥ ७॥

२४

कैसें करूं ध्यान कैसा पाहूं तुज । वर्म दावी मज याचकासी ॥ १॥
कैसी भक्ति करूं सांग तुझी सेवा । कोण्या भावें देवा आतुडसी ॥ २॥
कैसी कीर्ति वाणूं कैसा लक्षीं जाणूं । जाणुं हा कवणूं कैसा तुज ॥ ३॥
कैसा गाऊं गीतीं कैसा ध्याऊं चित्तीं । कैसी स्थिति मति न कळे मज ॥ ४॥
तुका म्हणे जैसें दास केलें देवा । तैसें हें अनुभवा आणीं मज ॥ ५॥

२५

काय तुज कैसें जाणावें गा देवा । आणावे अनुभवा कैशापरी ॥ १॥
सगुण निर्गुण स्थूल कीं लहान । न कळे अनुमान मज तुझें ॥ २॥
कोणता निर्धार करूं हा विचार । भवसिंधु पार तारावया ॥ ३॥

तुका म्हणे कैसें पाय आतुडती । न पडे श्रीपती वर्म ठावें ॥ ४ ॥

२६

स्तुती करूं तरी कोण माझी मती । वेदां पडे भ्रांति हें आश्चर्य ॥ १ ॥
परी हा जिव्हाग्रीं रामकृष्णहरी । बैसवीं लौकरी यातीगुण ॥ २ ॥
रूप गुण कीर्ति कृपाळू उदार । वर्णावया पार ब्रह्मा नेणें ॥ ३ ॥
रूपीं नामीं शिव होऊनिया वेडा । वर्णिला पवाडा रामनामीं ॥ ४ ॥
तुका म्हणे मज नेणवेचि शिव । नाहीं राहिला वाव बोलावया ॥ ५ ॥

२७

नामाचा प्रताप न वर्णवेचि मज । सांग गरुडध्वज राहे तेथें ॥ १ ॥
मम वाचा किती परतल्या श्रुती । वेद मुखें श्रुती मौन ठेले ॥ २ ॥
वर्णूं नेणें शेष नामाचा पवडा । चिरलिया रांडा जिव्हा त्याच्या ॥ ३ ॥
अनुसरली रमा वर्णावया श्रीहरी । पायांची किंकरी होऊनि ठेली ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही मानव किंकर । वर्णावया पार न कळे तुझा ॥ ५ ॥

२८

आम्हीं मानवानी वर्णावें तें काय । सुरवर पाय वंदिताती ॥ १ ॥
गणेश शारदा करिती गायन । आदिदेव गण श्रेष्ठ श्रेष्ठ ॥ २ ॥
जयाच्या गायना तिष्ठतो शंकर । तयासी पैं पार न कळे तुझा ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही किंकर ते किती । इंद्राची ती मती नागविली ॥ ४ ॥

२९

अगा महाविष्णु अनंत भुजांच्या । आम्हां अनाथांच्या सोयरीया ॥ १ ॥
न कळे महिमा वेद मौनावती । तेथें माझी मति कोणीकडे ॥ २ ॥
काय म्यां वर्णावें तुझ्या थोरपणा । सहस्रवदना शक्ति नव्हे ॥ ३ ॥
रविशशी जेथें तेजें सामावती । तेथें माझी मती कोणीकडे ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही बाळ तूं माऊली । करावी साउली करुणेची ॥ ५ ॥

३०

नमो विश्वरूपा अगा मायबाप । अपारा अमूपा पांडुरंगा ॥ १ ॥
विनवितो रंक दास मी सेवक । वचन तें एक आइकावे ॥ २ ॥
तुझी स्तुती वेद करितां भागला । निवांतचि ठेला नेति नेति ॥ ३ ॥
ऋशि मुनि बहु सिद्ध कविजन । वर्णितां तुझे गुण न सरती ॥ ४ ॥
तुका म्हणे तेथें काय माझी वाणी । जे तुझी वाखाणी कीर्ति देवा ॥ ५ ॥

३१

विनविजे ऐसे भाग्य नाहीं देवा । पायांशीं केशवा सलगी केली ॥ १ ॥
धीटपणे पत्र लिहिलें आवडी । पार नेणें थोडी मति माझी ॥ २ ॥
जेथें वेदां तुझा न कळेचि पार । तेथें मी अपार काय वानूं ॥ ३ ॥
जैसे तैसे माझे बोल अंगिकारी । बोबड्या उत्तरी गौरवितो ॥ ४ ॥
तुका म्हणे विटेवरी जीं पाऊलें । तेथें म्यां ठेविलें मस्तक हें ॥ ५ ॥

३२

त्रिगुण आटीव वाचेचा पसारा । पडेल विचार सर्व रस ॥ १ ॥
आदि मध्य अंतीं नाहीं अवसान । जीवनीं जीवन मिळुनी गेलें ॥ २ ॥
रामकृष्ण नाम माळ ही साजिरी । ओंविली गोजिरी कर्णीं मनी ॥ ३ ॥
तुका म्हणे तनु झाली हे शीतल । आवडी सकळ ब्रह्मानंदें ॥ ४ ॥

३३

इतुकें करीं देवा ऐकें वचन । समूळ अभिमान जाळीं माझा ॥ १ ॥
इतुकें करीं देवा आइकें हे गोष्टी । सर्व समदृष्टी तुज देखें ॥ २ ॥
इतुकें करीं देवा विनवितों तुज । संतचरण रज वंदी माथां ॥ ३ ॥
इतुकें करी देवा आइकें हे मात । हृदयीं पंढरीनाथ दिवसरात्रीं ॥ ४ ॥
भलतियां भावें तारी पंढरीनाथा । तुका म्हणे आतां शरण आलों ॥ ५ ॥

॥ इति श्रीतुकाराम हरिपाठ समाप्त ॥

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 25, 1999